रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

दिनांक : 12 मार्च 2020

## सांस्कृतिक विभाग

## मा. यशवंतराव चव्हाण जयंती

आर्टस, सायन्सॲण्डकॉमर्सकॉलेजरामानंदनगरयेथे बुधवार, दिनांक 8 जानेवारी 2020 रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक विभागाच्या वतीने प्रतिमापूजन करण्यात आले. **यशवंतराव बळवंतराव चव्हाण** हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी काही काळ भारताचे उपपंतप्रधान म्हणून काम केले होते. तर काही काळ ते भारताचे संरक्षणमंत्री सुद्धा होते. यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च, १९१३ रोजी सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी झाला. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ते ओळखले जातात. ते प्रागतिक विचारसरणीचे होते. उत्कृष्ट संसदपटू, उदारमतवादी व अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती आहे. ते रसिक व साहित्यिकही होते. "युगांतर", "सह्याद्रीचे वारे", "कृष्णाकाठ", "ऋणानुबंध" ही त्यांची साहित्यसंपदा आहे.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी.कदम, मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. प्रतिभा पुदाले यांच्यासह कार्यालयीन सेवकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

**निष्पत्ती (Outcome)**

- उपस्थितांना मा. यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यकतृत्वाची माहिती मिळाली.

लाभार्थी संख्या : 53




प्रमुख
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)